**प्रेसनोट** दि. १३/०७/२०२६

यातील तक्रारदार हे उदरनिर्वाहासाठी शेती सोबत मुरूम वाहतुकीचा व्यवसाय करत असून, बेलाटी येथील शेतातील विहीर खोदकामातून निघालेल्या मुरूमाच्या वाहतुकीसाठी आणि वापराची परवानगी मिळण्याकरिता तहसीलदारांकडे दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने, तहसीलदार, उत्तर सोलापूर यांनी तिन्हे येथील मंडल अधिकारी श्री माने यांना स्थळ पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. सदर प्रकरणी मुरूमाची पाहणी करून सकारात्मक अहवाल देण्यासाठी मंडल अधिकारी श्री माने यांनी तक्रारदार यांचेकडे १,००,०००/- रूपयांच्या लाचेची मागणी केल्याने तक्रार प्राप्त होती.

प्राप्त तक्रारीची पडताळणी शासकीय पंचांच्या उपस्थितीत करण्यात आली असून पडताळणी दरम्यान मंडल अधिकारी श्री माने यांनी तक्रारदाराकडे १,००,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुद्ध सलगरवस्ती पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र. |
| पोलीस ठाणे/गुन्हा नोंदक्रमांक | सलगरवस्ती पोलीस ठाणे, सोलापूर शहर गु.र.नं.२३०/२०२६ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ प्रमाणे. |
| आरोपीचे नाव व कार्यालय | श्री. विजयकुमार माने, मंडल अधिकारी, तिन्हे मंडल, तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,००,०००/- रुपये. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | लाच मागणी |
| पडताळणी दिनांक | पडताळणी कारवाई- दि. २६/०५/२०२६ रोजी |
| सापळा दिनांक | दि.२७/०५/२०२६ |
| सापळा अधिकारी | श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर<br>श्री. रविंद्र लांभाते, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर |
| तपास अधिकारी | श्री. सुनिल पाटील, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे उदरनिर्वाहासाठी शेती सोबत मुरूम वाहतुकीचा व्यवसाय करत असून, बेलाटी येथील शेतातील विहीर खोदकामातून निघालेल्या मुरूमाच्या वाहतुकीसाठी आणि वापराची परवानगी मिळण्याकरिता त्यांनी तहसीलदारांकडे अर्ज केला होता. तक्रारदार व शेतकरी यांचेमध्ये विहिरीतील उपसा झालेला मुरूम वाहतुक करण्यासंदर्भात करार करण्यात आला होता. शेतकरी यांनी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने, तहसीलदार, उत्तर सोलापूर यांनी तिन्हे येथील मंडल अधिकारी श्री विजयकुमार माने यांना स्थळ पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. या प्रक्रियेअंतर्गत जागेची पाहणी करून सकारात्मक अहवाल देण्यासाठी मंडल अधिकारी श्री माने यांनी तक्रारदार यांचेकडे रॉयल्टी व्यतिरिक्त १,००,०००/- रूपयांच्या लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी ला.प्र.वि सोलापूर येथे तक्रार दिली होती.<br>प्राप्त तक्रारीची पडताळणी शासकीय पंचांच्या उपस्थितीत करण्यात आली. पडताळणी दरम्यान मंडल अधिकारी श्री विजयकुमार माने यांनी तक्रारदाराकडे १,००,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने वरीलप्रमाणे सलगरवस्ती पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. |

**सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपायुक्त/ पोलीस अधिक्षक, एसीबी पुणे मो.क्र ९८२३१६७१५४, श्री. अजित पाटील, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी पुणे. मो.क्र ९०२९०३०५३० यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर मो.क्र. ९८२३२२५४६५, पोलीस निरीक्षक रविंद्र लांभाते, सपोफौ कोळी, पोलीस अंमलदार संतोष नरोटे, शिरीषकुमार सोनवणे, स्वामीराव जाधव, श्रीराम घुगे, सलीम मुल्ला, गजानन किणगी, रवी हाटखिळे, राजू पवार, अक्षय श्रीराम, अनुप दळवी सर्व नेमणुक एसीबी सोलापूर यांनी केली.**

**लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देणेसाठी कायदेशीर फी व्यतरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर कार्यालयास संपर्क साधण्याचे आवाहन श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर. मो.क्र. ९८२३२२५४६५ यांनी केले आहे.**

**संपर्क पत्ता-** पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी महाराज रंगभवन चौक, सोलापूर.

**संकेतस्थळ-** www.acbmaharashtra.gov.in
**ईमेल-**www.acbwebmail@mahapolice.gov.in
**ऑनलाईन तक्रार ॲप-**acbmaharashtra.net
**टोल फ्री क्रमांक-** १०६४
**दुरध्वनी क्रमांक-** ०२१७-२३१२६६८
**व्हॉटसअॅप क्रमांक-**९४०४००१०६४

सहा.पो.आयुक्त/पोलीस उप अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर. सत्यमेव जयते

13/7/26
(प्रशांत चौगुले)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर

Scanned with OKEN Scanner